# प्रेसनोट

जा.क्र.स्था.गु.शा/ प्रेस नोट/3027 /२०२०
पोलीस अधीक्षक कार्यालय सिंधुदुर्ग
फॅक्स नं. ०२३६२-२२८२०५,
दिनांक - ९ /१०/२०२०.

**दिनांक १०/१०/२०२० रोजी सिंधुदुर्ग सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा आरक्षणाचे संबंधाने पुकारलेले बंद आंदोलन व दिनांक ११/१०/२०२० रोजी होणा-या राज्य सेवा पुर्व परीक्षा सुस्थितीत व नियोजनबध्द तसेच चोख पार पाडण्यासाठी जिल्हयात महा.पोलीस अधि.कलम ३७ (१)(३)मनाई आदेश व परीक्षा केंद्राच्या २०० मिटर परीसरात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ नुसार बंदी आदेश**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई यांचे मार्फत राज्य सेवा पुर्व परीक्षा २०२० ही रविवार दिनांक ११ ऑक्टोबर २०२० रोजी सकाळी १०.०० ते १२.०० व दुपारी १५.०० ते १७.०० या वेळेत १) विद्यामंदीर माध्यमिक प्रशाला कणकवली २) कणकवली कॉलेज कणकवली ३) एस. एम. हायस्कुल कणकवली या तीन उपकेंद्रावर घेण्यात येणार आहे. सदरची परीक्षा सुस्थितीत व नियोजनबध्द तसेच चोख पार पाडण्यासाठी श्री. रमेश पवार, कार्यकारी दंडाधिकारी, कणकवली यांनी या परीक्षा केंद्राच्या सभोवर २०० मिटर परीसरात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ नुसार खालील कृत्ये करण्यास मनाई केलेली आहे.

१) परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधित असलेले अधिकारी व कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस या परीसरात प्रवेश करता येणार नाही.

२) परीक्षा केंद्र व त्याच्या सभोवतालच्या २०० मिटर परीसरातील सर्व झेराक्स केंद्र चालू ठेवण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

३) परीक्षा केंद्र व त्या सभोवतालच्या २०० मिटर परीसरामध्ये फॅक्स, इ-मेल, व इंटरनेट सुविधा व इतर कोणत्याही संभाषणाचा अगर कोणत्याही पत्र व्यवहाराचा सुविधांचा वापर करता येणार नाही.

४) परीक्षा केंद्र व त्या सभोवतालच्या २०० मीटर परीसरात सर्व सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी, आयएसडी, ध्वनीक्षपेक चालू ठेवण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

वरील आदेशाचे जो कोणी उल्लंघन करेल तो भारतीय दंड संहिता कलम १८८ मधील कलम तरतुदीनुसार होणाऱ्या शिक्षेस सदर इसम पात्र ठरणार आहे.

**तसेच दिनांक ०९.१०.२०२० रोजी ००.०० ते दिनांक ११.१०.२०२० रोजी रात्रौ २४.०० वाजे पर्यंतच्या कालावधीसाठी बंद आदोलन व राज्य सेवा पुर्व परिक्षेच्या संबधाने कोठेही अनुचित प्रकार घडु नये जिल्हयातील जातीय सलोख्रा आणि कायदा व सुव्यवस्था परीस्थीती अबाधित राहावी याकरीता मा.जिल्हादंडाधिकारी सिंधुदुर्ग यांनी सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये संपुर्ण भुभागात खालील कृत्ये करण्यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३) नुसार मनाई केलेली आहे.**

कलम ३७(१) प्रमाणे सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये संपुर्ण भुभागात खालील कृत्ये करण्यास मनाई केलेली आहे.

अ) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दांडे, बंदुका, सुरे, काठया किंवा लाठया किंवा शारीरिक इजा करण्यांसाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तु बाळगणे

ब) अंग भाजुन टाकणारा पदार्थ किंवा कोणताही स्फोटक पदार्थ घेवून फिरणे

क) दंगड किंवा इतर क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे.

ड) व्यक्तींची किंवा प्रेते किंवा आकृती किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे ( ज्या कारणामुळे समाजाच्या भावना दुखविली जाण्याची शक्यता असते.)

इ) सार्वजनिक रितीने आक्षेपार्ह घोषणा करणे, गाणी म्हणणे किंवा वादय वाजविणे.

कलम ३७(३) प्रमाणे प्रमाणे सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये संपुर्ण भुभागात खालील कृत्ये करण्यास मनाई केलेली आहे.

अ) सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पाच अगर पाचाहून जादा लोकांनी एकत्र जमा होणे, जमाव करणे, मिरवणुका काढणे व सभा घेणे.

आ) हा हुकुम ज्या सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये व अधिकार बजावणीचे संदर्भात उपनिर्दीष्ट वस्तु हाताळाव्या लागतात आणि एकत्र जमावे लागते व ज्या व्यक्तींनी पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग अगर संबंधित उप विभागीय पोलीस अधिकारी यांना संबंधित विभागाचे पोलीस निरीक्षक किंवा सक्षम पोलीस अधिकारी यांची परवानगी घेतलेली आहे. अशा व्यक्तींनी आणि लग्न इत्यादी धार्मिक समारंभ, प्रेतयात्रा यांस लागू पडणार नाही.

वरील कालावधीतील मिरवणुकांना परवानगी देण्यांचे अधिकार तसेच ध्वनीक्षेपक वाजविण्यांस परवानगी देण्यांचे अधिकारी पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग तसेच त्यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांस व सिंधुदुर्ग जिल्हयातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांस राहील.

वरील आदेशाचे जो कोणी उल्लंघन करीत तो महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.

( एस.के.धनावडे )
पोलीस निरीक्षक,
स्थागुअशा ,सिंधुदुर्ग.

प्रति,

मा. जिल्हा माहिती अधिकारी
सिंधुदुर्ग